**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
Website :www.mahadiscom.in

क्र. मासं/मावक/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड,माटुंगा,
मुंबई-४०००१९.
email : managerbcrrc1@gmail.com

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६९९ दिनांक : २८/१०/२०२५

**विषय:** अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ:** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५९८ दि. ३१/१२/२०१९.
२) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२०६२१ दि. २७/११/२०२०.
३) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२६७१५ दि. २९/१०/२०२१.
४) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२७५०८ दि. २०/१०/२०२२.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५१ दि. १८/०१/२०२३.
६) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६८० दि. १०/१०/२०२४.
७) शासन परिपत्रक क्र. बीसीसी-११२३/प्र.क्र.२९ए/१६-ब दि. १८/०९/२०२५.

-------------

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २१/१२/२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरीता अथवा ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय कंपनीने प्रशासकीय परिपत्रक क्र. ५९८ दि. ३१/१२/२०१९ अन्वये अंगीकृत केला आहे. तसेच, अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना दि. २७/११/२०२०, दि. २८/१०/२०२१ व दि. १४/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून त्या अनुषंगाने संदर्भिय परिपत्रकांन्वये सूचना पारित करण्यात आलेल्या होत्या.

२. तदनंतर, दि. १४/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवाविषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत. तसेच सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ (एक) दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच, दि. ०४/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये अन्वये अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवाविषयक लाभांसाठी (पदोन्नती, अनुकंपा धोरण वगळून) क्षमापित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णय संदर्भिय प्रशासकीय परिपत्रक क्र. ६ अन्वये अंगीकृत करण्यात आला आहे.

३. आता, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-११२३/प्र.क्र.२९ए/१६-ब दि. १८/०९/२०२५ अन्वये अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत व सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना ११ महिन्यानंतर देण्यात येणारा १ (एक) दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने सूचना पारित करण्यात आली आहे. सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे.

४. सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८/०९/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकातील आदेश/सूचना यांचे काटेकोरपणे पालन होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या MSEDCL E-Library Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\Admin\Downloads\ST Circular_18.09.2025_GR_Revised (1).docx

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना
मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी ११२३/प्र.क्र.२९ए /१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१.१२.२०१९.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ए/१६-ब, दि. १४.१२.२०२२
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी ११२३/प्र.क्र.२९/१६-ब, दि. ०४.१०.२०२४

**प्रस्तावना :**

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ८९२८/२०१५ मध्ये दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे व त्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता सुरु ठेवण्याचे आदेश संदर्भाधीन क्र. १ येथील दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना, संदर्भाधीन अ.क्र. २ येथील दिनांक १४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये सेवाविषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करून त्यांच्या सेवा प्रत्येक ११ महिन्यानंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. ३ येथील दि.४.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा १ दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक लाभांसाठी (पदोन्नती, अनुकंपा धोरण वगळून) क्षमापित करण्यात आलेला आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२४ अनुषंगाने अधिसंख्य पदावर वर्ग झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन त्यांच्या सेवा ११ महिन्यापर्यंत पुढे सुरु आदेश निर्गमित करावेत किंवा कसे याबाबत विविध मंत्रालयीन विभागांकडून अभिप्रायार्थ प्रस्ताव प्राप्त होत आहेत. त्यानुषंगाने सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना व आस्थापनांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांनतर देण्यात येणारा १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेतः-

सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.१२.२०१९ अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड दिल्यामुळे त्यांना सेवाविषयक ( पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून ) व सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करण्याकरीता येणारी तांत्रिक अडचण दूर व्हावी याकरीता शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२४ अन्वये १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्यात आला आहे. तथापि, हे अधिसंख्य पदावरील अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अधिसंख्य पदावरच कार्यरत राहणार आहेत. सदर बाब विचारात घेता, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत दर ११ महिन्यांनी सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सेवा सुरु ठेवण्याबाबतचे आदेश संबंधित विभागांनी निर्गमित करणे आवश्यक राहिल.

२. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/ आस्थापनांना सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना द्याव्यात.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०९१८१६३८५०८९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सु.ए. आंधळे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा

७) सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद, सदस्य
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९) मा.अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व सहायक आयुक्त (मागास वर्ग कक्ष)
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१८) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
२१) सचिव, राज्य निवडणूक आयोग
२२) सचिव, राज्य माहिती आयोग
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२४) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा, नगरपालिका
२७) संचालक, समाजकल्याण, पुणे
२८) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२९) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३०) संचालक, सेवायोजन, मुंबई
३१) निवडनस्ती